<u>रे.मु.नं. ५७३/२०१५ मधील नि.२६ वरील आदेश</u>

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केला आहे.

२ प्रतिवादी असे कथन करतात की, दाव्या संदर्भाने महत्वाच्या जून्या व कागदपत्रांची माहीती प्रतिवादींना त्वरीत उपलब्ध्य झाली नाही त्यामूळे कैफियत दाखल करण्यास उशीर झाला आहे. त्यांचे पुढे असे कथन आहे कि, दावा मिळकती संदर्भात वादी व प्रतिवादी यांच्यात गंभीर तक्रारी आहेत. प्रतिवादींची कैफियत न स्विकारल्यास त्यांचे कधीही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. याउलट वादीचे काहीही नुकसान होत नाही. सबब कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३ वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करून त्याचा आक्षेप नोंदविला आहे. त्याच्या मते अर्जातील कारण हे खरे नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर व्हावा अशी विनंती केली आहे व अर्ज मंजूर झाल्यास रू २०००/— खर्च देण्यात यावा.

४ उभयपक्षाच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १ ते ३ हे दि. ६/११/२०१५ रोजी प्रकरणात हजर झाल्याचे दिसून येते. त्यांच्याकडुन कैफियत दाखल करण्यास जवळपास ८ महीन्यांपेक्षा जास्त विलंब झालेला आहे. प्रस्तुत प्रकरण गुणदोषावर निकाली करण्यासाठी प्रतिवादींना त्यांची कैफियत मांडण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. त्यामुळे न्यायाचा हेतु साध्य करण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा अर्ज रक्कम रू. ५००/— इतक्या खर्चावर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ते ३ यांनी वादीस पुढील तारखेपर्यंत प्रस्तूत अर्जाचा खर्च देणे बंधनकारक राहील.

दि.१५.०३.२०१७ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश,क स्तर,बार्शी

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R.H.Lasane. |
| Court | : | 3rd JtCJJD & JMFC, Barshi. |
| Date: | : | 15/3/2017 |
| Judgment/Order signed by the presiding officer | : : | 15/3/2017 |
| Judgment/Order uploaded on | : : | 16/3/2017 |